५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण आणि समन्वय याकरिता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत "समन्वय अधिकारी" यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२२/पापु-०२

जी.टी.हॉस्पिटल संकुल, ७ वा मजला
नविन मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: १७ जानेवारी, २०१८

वाचा :

१) शासन परिपत्रक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२२/पापु-०२, दि.१५/१२/२०१६

२) सचिव, महसुल व वन विभाग यांचे अर्धशासकीय पत्र क्र.साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११, दि.०४.१०.२०१७.

परिपत्रक :

राज्याला समृध्द आणि सुरक्षित पर्यावरण देण्यासाठी व वनक्षेत्र २० टक्के वरुन ३३ टक्के पर्यंत नेण्यासाठी "हरित महाराष्ट्र" ही संकल्पना राबविण्यात येत आहे. दि. १ जुलै, २०१६ रोजी २ कोटी वृक्षरोपणाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला होता. वृक्षरोपणाची गती तुटू न देता त्यात सातत्य रहावे म्हणून सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यात सर्व प्रशासकीय विभागांचा समावेश आहे. तसेच प्रत्येक विभागास वृक्षरोपणाचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले आहे.

२. सन २०१६ मध्ये २ कोटी ऐवजी २.८३ कोटी वृक्ष लागवड झाली. सन २०१७ मध्ये ४ कोटी ऐवजी ५.४३ कोटी वृक्षारोपण झाले. आता, सन २०१८ आणि सन २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टांतर्गत प्रत्येक विभागाला दिलेले लक्ष्य साध्य करणे आवश्यक आहे. तसेच याकरीता क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहीत करणे, त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण ८०-९०% इतके राखण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेणे, इ.बाबींचे समन्वय व नियंत्रण मंत्रालय स्तरावरुन होण आवश्यक आहे. त्यानुषंगाने या प्रकरणी वृक्ष लागवड

कार्यक्रमांतर्गत नियोजन अंमलबजावणी, संनियंत्रण आणि समन्वयन याकरिता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत खालील अधिकाऱ्याची "समन्वय अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात येत आहे :-

.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	नियुक्ती पद	संपर्क दूरध्वनी क्र.	ई-मेल
१.	श्री.म.भ.सावंत, उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	समन्वय अधिकारी (Nodal Officer)	भ्र.क्र.९९८७७९२९९९ कार्या-०२२-२२६१७३१३	**mahesh.sawant60@gov.in**

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११६१७१४१४२१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.01.17 10:23:02 +05'30'

म.भ.सावंत

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अप्पर मुख्य सचिव (पा.पु.व स्व.वि),जी.टी.संकुल नवीन मंत्रालय, मुंबई ३२.
२. प्रधान सचिव (वने),महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई ३२.
३. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईट मुंबई
४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
५. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,
७. उप सचिव/अवर सचिव, पा.पु.व स्व.वि,
८. कक्ष अधिकारी (फ-११) , म.व.व वि. मंत्रालय मुंबई ३२
९. निवड नस्ती.